| | |
|---|---|
| | **<u>नि.दि.दा.क्र. १०५/२०१४ मधील निशाणी ४९ व ५० वरील संयुक्त आदेश</u>**<br><br>श्री. विष्णु रामा पाटील वि. श्री. विठ्ठल यल्लाप्पा पाटील |

प्रस्तुतचा दावा हा निरंतर मनाई हुकूमाचा आहे. प्रस्तुतचे अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम ६, नियम १७ व दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम १, नियम १० (२) अन्वये दाखल केला आहे. नि.क्र. ४९ वर दाखल केलेल्या अर्जाद्वारे वादी हे वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मागत आहेत. तसेच नि.क्र. ५० वर दाखल केलेल्या अर्जाव्दारे वादी हे वादपत्राचे शिर्षकामध्ये प्रतिवादी क्र. ४ म्हणून श्री. शिवमुर्ती रामा पाटील यांचे नाव समाविष्ट करणेस परवानगी मागत आहेत. तथापि, दोन्ही अर्जांचे स्वरूप पाहता प्रस्तुतचे अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम १, नियम १० तसेच क्रम ६, नियम १७ अन्वये एकत्र हाताळण्यात येत आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, सदरचा दावा प्रतिवादी विरुध्द निरंतर मनाईसाठी दाखल केलेला आहे. वादीचा नि.क्र. ५ वरील तुर्तातूर्त मनाई अर्ज दि. ०९/०२/२०१६ रोजी मंजुर झालेला आहे. नि.क्र. ४९ वरील अर्जाव्दारे वादी वादपत्रामध्ये परिच्छेद क्र. ४–अ म्हणून "प्रस्तुतचा दावा प्रलंबित असताना यातील वादीच्या कब्जे वहिवाटीतील दावा मिळकत यातील प्रतिवादी क्र. १ यांनी दावा मिळकतीच्या उत्तरेकडील (ग्रा.पं.मि.क्र. ४) या मिळकतीचे मालक शिवमुर्ती रामा पाटील यांचेकडून बेकायदेशीरपणे खरेदी केलेली आहे व शिवमुर्ती रामा पाटील यांनी चुकीच्या चतु:सीमा दाखवून प्रस्तुतची वादीच्या ताब्यातील दावा मिळकत दि. १६/१०/२०१८ रोजीच्या रजि. खरेदी दस्त नं. १३३१/२०१८ ने प्रतिवादी क्र. १ यांना खरेदी दिली आहे व प्रस्तुतचे खरेदीपत्र वादीवर मुळीच बंधनकारक नाही" हा मजकुर समाविष्ट करून वादपत्रामध्ये दुरूस्ती करण्याची परवानगी मागत आहेत तसेच, परिच्छेद क्र. ९–फ म्हणून ''यातील प्रतिवादी क्र. १ यांना शिवमुर्ती रामा पाटील यांनी दि. १६/१०/२०१८ रोजी करून दिलेले खरेदीपत्र वादीवर बंधनकारक नाही असे हक्कज्ञापन होवून मिळावे'' हा मजकुर समाविष्ट करून वादपत्रामध्ये दुरूस्ती करण्याची परवानगी मागत आहेत. तसेच नि.क्र. ५० वरील अर्जाव्दारे वादी वादपत्राच्या शिर्षकामध्ये प्रतिवादी क्र. ४ म्हणून श्री. शिवमुर्ती रामा पाटील यांचे नाव समाविष्ट करून मिळावे म्हणून प्रस्तुतचा अर्ज दाखल केला असून सदरचे दोन्ही अर्ज मंजूर करण्याची वादींनी विनंती केली आहे.

३. या कामी प्रतिवादी क्र. ३ यांनी नि.क्र. ५३ व ५४ वर खुलासा सादर करून वादीचा प्रस्तुतचे दोन्ही अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे. प्रतिवादी क्र. १ यांनी श्री. शिवमुर्ती रामा पाटील यांची ग्रामपंचायत मिळकत नंबर ४/४ ही मिळकत खरेदी केलेली आहे. मुळात यातील वादी यांचा प्रस्तुतचा दावा हा यातील प्रतिवादी यांचेविरूद्ध ग्रामपंचायम मिळकती नंबर ४/१, ४/२, ४/३ या तीन मिळकती संदर्भात असून श्री. शिवमूर्ती रामा पाटील यांचे ग्रामपंचायम मिळकत नंबर ४/४ या मिळकती संदर्भात मुळीच नाही. जर यातील वादी यांची ग्रामपंचायत मिळकत नंबर ४/४ या मिळकतीबाबत कोणतीही तक्रारीची किंवा गाऱ्हाण्याची बाब असती तर यातील वादी यांनी श्री. शिवमुर्ती रामा पाटील यांचे नावची ग्रामपंचायत मिळकत नंबर ४/४ ही मिळकत देखील मुळ दाव्यामध्ये समाविष्ट करून आणि श्री. शिवमुर्ती रामा पाटील यांचेविरुद्ध वादी यांनी दावा दाखल केला असता व त्यांचेविरूद्ध कायदेशीर दाद मागितली असती. परंतु, मुळ दावा दाखल करतेवेळी श्री. शिवमुर्ती पाटील यांची ग्रामपंचायत मिळकत नंबर ४/४ ही मिळकत वादी यांनी मुळ दाव्यात समाविष्ट केलेली नाही. कारण सदर मिळकतीशी यातील वादी यांचा कोणताही हक्कसंबंध नव्हता असा याचा अर्थ होतो. म्हणून वादी यांनी प्रस्तुतची मिळकत सदर दाव्याकामी समाविष्ट केलेली नाही. वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज हा केवळ यातील प्रतिवादी यांना आर्थिक भुर्दंड व मानिसक स्वरूपाचा त्रस देणेच्या दृष्ट हेतूने प्रेरित होवून दाखल केलेला असलेले तो प्रथमदर्शनीच फेटाळण्यात यावा ही विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादी व प्रतिवादी यांच्या कथनांचा विचार करता खालील मुद्दे या अर्जाच्या निकालासाठी उपस्थित होत असून त्यांचे निष्कर्ष खालील कारणमिमांसेच्या आधारे देण्यात आले.

| | **विचारार्थ बाबी** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | वादी नि.क्र. ४९ दुरूस्तीचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे काय ? | | होय. |
| २. | वादीने नि.क्र. ५० मध्ये नमूद केल्याप्रमाणे ते प्रतिवादी क्रं. ४ चे नाव समाविष्ट करुन घेवू शकतात काय ? | | होय. |
| ३. | आदेश काय ? | | अंतिम आदेशाप्रमाणे. |

# **कारणमिमांसा**

**विचारार्थ बाबी क्र. १ व २ चे संदर्भात –**

५. वादीने नि.क्र. ४९ चा अर्ज ज्या तरतुदीच्या अनुषंगाने दाखल केला आहे ती तरतुद पाहणे आवश्यक ठरते. सदर तरतुद म्हणजे दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम ६, नियम १७ पुढीलप्रमाणे उध्दृत करते. :–

> "१७. न्यायालयास कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर दोहोंपैकी कोणत्याही पक्षकारास, त्याच्या वादकथनास न्याय्य असेल अशा रितीने व अशा अट्टींवर बदल करण्याची किंवा दुरुस्ती करण्याची मुभा देता येईल आणि पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न अभिनिर्णित करण्यासाठी आवश्यक असतील त्याप्रमाणे अशा सर्व दुरुस्त्या केल्या पाहिजेत. परंतु, वाजवी दक्षता बाळगुन सुध्दा, वादाची चौकशी आरंभ होण्यापूर्वी, तो पक्ष, अशी दुरुस्ती मागणी करु शकली नाही असे न्यायालय निष्कर्षाप्रत आल्याशिवाय, दाव्याच्या सुनावणीची सुरुवात झाल्यानंतर, असा दुरुस्तीचा अर्ज मान्य करता येणार नाही."

६. उपरोक्त तरतुदीचे काळजीपूर्वक अवलोकन करता, दाव्याच्या प्रभावी सुनावणीस सुरुवात झाल्यानंतर, संबंधित पक्षकार वाजवी दक्षता बाळगुन सुध्दा, अशा प्रकारची दुरुस्ती करण्यास सक्षम नव्हता याबाबत न्यायालय निष्कर्षाप्रत आल्याशिवाय वाद प्रकरणाच्या प्रभावी सुनावणी सुरु झाल्यानंतर असा दुरुस्तीचा अर्ज मान्य करता येणार नाही हे स्पष्ट होते . त्यामुळे, उपरोक्त तरतुदीनुसार हे स्पष्ट आहे की , न्यायालयास प्रकरणाच्या कोणत्याही टप्प्यावर वाद कथनांमध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी देण्याचा अधिकार आहे. मात्र, अशी दुरुस्ती वादातील पक्षकारांमध्ये असणाऱ्या वादप्रश्नांचे निराकरण करण्यास अथवा निश्चित करण्यास आवश्यक असले पाहिजे. तथापि, सदर तरतुदीखाली असणाऱ्या परंतुकानुसार, अशी दुरुस्ती मागणी करणाऱ्या पक्षकाराने वाजवी दक्षता बाळगून सुध्दा संबंधित पक्षकार वादाची चौकशी सुरु होण्यापूर्वी अशी दुरुस्ती मागण्यास असमर्थ होता असे न्यायालयाचे निष्कर्ष झाल्याशिवाय अशी दुरुस्ती दाव्याची चौकशी सुरु झाल्यानंतर मान्य करु नये. अभिलेखावरील वादीचा नि.क्र. ४९ व ५० वरील अर्ज, प्रतिवादींचे म्हणणे, कागदपत्रे व एकंदर परिस्थिती विचारात घेता असे निदर्शनास येते की वादीने प्रतिवादी विरूध्द सदरचा दावा निरंतर मनाई मिळणेसाठी दाखल केला आहे. वरील सर्व गोष्टींचा

विचार करता मी या तथ्य विषयक आणि विधिविषयक निर्णयाप्रत आलेलो आहे की, न्यायाच्या दृष्टीने सदरचा अर्ज मंजुर करणे आवश्यक आहे म्हणून मी **विचारार्थ बाब क्र.१ व २** चे उत्तर **होकारार्थी** लिहून विचारार्थ बाब क्र.३ करिता पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. वादीचा अर्ज नि.क्र. ४९ व ५० मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीने या आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसाच्या आत उपरोक्त प्रमाणे वादपत्रात दुरुस्ती करावी व दुरुस्ती दाव्याची प्रत व त्याच्या पुरेश्या प्रतींसह व हुकूमनाम्यासाठीच्या प्रतीसह अभिलेखावर दाखल करावे.

३. वादीने अर्जात नमुद केलेप्रमाणे वादपत्राच्या शिर्षकामध्ये प्रतिवादी क्रं. ४ म्हणून श्री. शिवमुर्ती रामा पाटील यांचे नाव समाविष्ट करावे.

४. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

DISTRICT COURT, MAHARASHTRA

Digitally signed by Amrit Chandrakant Birajdar
Date: 2022.11.10 16:48:22 +0530

चंदगड
दिनांक – १०/११/२०२२

(अमृत चं. बिराजदार)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, चंदगड.